ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 8 | APRIL - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# " मराठेशाही सांस्कृतिक जीवनातील शाहिरी लावणी परंपरेचा अभ्यास "



डॉ. सचिन गोवर्धन कांबळे
भारतीय जैन संघटनेचे कला विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय वाघोली, पुणे.

## प्रस्तावना:

मराठेशाहीच्या काळात सांस्कृतिक जीवनात शाहिरी काव्याचा दुसरा प्रकार म्हणजे ' लावणी'ला महत्त्व दिले जात होते. पूर्वपेशवाईच्या काळातच लावणीचा जन्म झाला. स्वराज्याच्या शेवटच्या कालखंडापर्यंत लावणी हा शाहीरी काव्याचा प्रकार बहरत गेला. मराठेशाहीच्या ऐश्वर्याच्या काळात शाहिरांना मिळालेला राजाश्रय, लोकाश्रयातून रंगदार, ढंगदार, बहारदार लावणीचा प्रकार नावारूपाला आला. शिवकाळात या प्रकाराला फारसे महत्व नव्हते परंतु पेशवेकाळात लावणी हा शृंगारिक प्रकार बहारास आला. पेशव्यांच्या ऐशआरामी जीवनामुळे या घटकास सांस्कृतिक जीवनात दर्जा प्राप्त होत गेला.मराठेकालीन पेशवाईच्या उत्तर काळात लावणी बहराला आली पेशवाईच्या विनाश काळात लावणीचा -हास होण्यास सुरूवात झाली.शाहीरी वाङ्मयाचा दुसरा भाग लावणी असल्याने यात लौकिक जीवनाची साक्ष मिळते.मराठेशाहीच्या काळात सांस्कृतिक जीवनात शाहिरी काव्याचा परिचय होतो.लावणी या शाहिरी काव्याचे याचे आकलन जाणून घेण्याच्या हेतूनेच 'मराठेशाही सांस्कृतिक जीवनातील शाहिरी लावणी परंपरेचा अभ्यास' प्रस्तुत शोध निबंध अशी रचना केलेली आहे.

## संशोधनाचे उद्देश:

१. मराठेशाहीच्या काळात सांस्कृतिक जीवनात शाहिरी काव्याचा अभ्यास करणे.
२. पेशवेकाळात लावणी हा शृंगारिक प्रकार कसा बहारास आला ते स्पष्ट करणे
३. पेशवेकाळात मनोरंजनाची कला अधिकच कशी विस्तारली ते विस्ताराने मांडणे.
४. लावणी या लोककलेचे प्रकार अभ्यासने.
५. मराठेकालीन कालखंडात लावणीतील लोकजीवन व त्याचे विषयविस्ताराने मांडणे

या उद्देशावर आधारित प्रस्तुत शोधनिबंधाची रचना करण्यात आलेली आहे.

## विषय विवेचन :

लावणी' या शब्दाचा अर्थ श्री.कृ.पा.कुलकर्णी यांच्या मते, ▪ लावणी' या शब्दाची उत्पत्ती संस्कृतमधील रोवणे, चिकटणे, जोडणे अशा अर्थाच्या लग्-ली-रग-री या पैकी कोणत्याही धातूपासून असू शकेल तरीही लापनिक या शब्दापासून लावणी शब्द तयार झाला आहे.[१]

मा.श्री.भ.वा.धोंड यांच्यामते लावणी म्हणजे, सर्वसामान्य जनांच्या मनोरंजनाकरिता त्यांना रूचतील अशा लौकिक, पौराणिक व आध्यात्मिक विषयावर रचलेली कडे, अथवा सोलके यांच्या तालावर विशिष्ट ढंगाने म्हटलेली, खटकेबाज व साईदार पद्यावर्तनी वा भृंगावर्तनी जातिरचना म्हणजे लावणी, हा प्रकार प्राकृतातीलच आहे. याशिवाय ज्ञानेश्वरीच्या सोळाव्या अध्ययात हा प्रकार वापरला आहे असे विधान त्यांनी मांडले.

▪ तेया निरूपनाचेनि नावे । अध्यायपद सोळावे ।
लावणी पाहता जाणावे । मागिल वरि ।'[२]

लावणी या शब्दाचा अर्थ व्युत्पत्तीकोश कार यांनी मांडला त्याचे मते, 'लावणी म्हणजे एक प्रकारचे ग्राम्यगीत होय. ज्याची लक्षणे ग्राम्यता, शृंगार, गेयता ही तीन मुख्य आहेत.' श्री. कोल्हटकर अच्युत बळवंत यांच्या मते, हदयाला चटका लावते ती लावणी असा संदर्भ लावणी या शब्दामध्ये आहे. मराठेकालीन सांस्कृतिक जीवनात 'लावणी' हा प्रकार सामाजिक जाणीवेतून निर्माण झाला. तत्कालीन काळामध्ये लावणीमध्ये तीर्थक्षेत्रांची वर्णने, पौराणिक कथा, राधाकृष्ण संवाद, पुण्याचे वर्णन, पौराणिक कथा, राधाकृष्ण संवाद, शेती, उदयोग, व्यवसाय, सरदार, सेनापती, राजे, महाराजे, लावण्यवती स्त्री इ. विविध विषयांचा समावेश लावणीमध्ये केला जात होता. थोडक्यात लावणीमधून सामाजिक, राजकीय, आध्यात्मिक, पौराणिक विषयांचा स्विकार केलेला होता. मराठेकाळातील शाहीरांनी लोकमानरंजनासाठी लावणीची रचना केली.[३]

शाहीरी वाङ्मयाचा दुसरा भाग लावणी असल्याने यात लौकिक जीवनाची साक्ष मिळते. मराठेकाळात सवाई माधवराव पेशवे यांच्या कारकीर्दीपासून शेवटचा पेशवा दुसरा बाजीराव या उत्तर पेशवाईच्या काळात अस्सल मराठी लावणी सांस्कृतिक जीवनात भरभराटीस आली. या काळात पौराणिक प्रणाली मागे पडली त्याची जागा प्रत्यक्ष वावरणारे वीरपुरूष, सरदार, शिपाईगडी, नायक यांनी घेतली. लावणीमधील कृष्णगोवींची जागा विरहव्याकुळ व प्रेमातुर अशा मराठमोळ्या स्त्रियांनी घेतली. मराठी शाहीरांनी प्रत्यक्ष जीवनातील स्त्री व पुरूषांना आपल्या गीतात नायकनायिका बनवून आपले काव्य समाजजीवनाशी सापेक्ष केले.[४] त्यानंतर लावणी हा प्रकार तमाशाचा मुख्य घटक बनला त्यामुळेच तमाशा या प्रकारास लावण्यांचा कार्यक्रम म्हणूनही ओळखले जावू लागले मात्र या प्रकारास लावण्यांचा कार्यक्रम म्हणूनही ओळखले जावू लागले. मात्र शिवकाळात शाहीरी वाङ्मयातून राजकीय इतिहास, शौर्य वर्णन करण्याची परंपरा पेशवेकाळात लावणीच्या माध्यमातून लौकिक जीवन, शृंगार रसाची मांडणी करणारा हा प्रकार उदयास आला.

पेशवेकाळात लावणी हा प्रकार नावारूपाला आणणारे होनाजी बाळा, अनंत फंदी, परशुराम, रामजोशी, सगनभाऊ, प्रभाकर, गंगु हैबती, जोतीराम इ. अनेकांनी शाहीरी व लावणी प्रकारामध्ये योगदान दिले. पेशवेकाळामध्ये पेशव्यांच्या आश्रयाने महाराष्ट्राच्या विविध भागामध्ये लावण्यांची रचना करणारे शाहीर निर्माण झाले. उदा. तुळजापुर, नागपुर, कराड, सातारा, मराठवाडा, बार्शी, जुन्नर, संगमनेर, कोकण, कोल्हापूर, बालाघाट या भागातील लावणीकार केवळ मनोरंजन व पैशासाठीच लावणीची रचना करू लागले.[५] त्यांच्या या रचनेमध्ये व्यक्तीवर्णनाच्या लावण्या, विविध भाषिक लावण्या, विनोदी, प्रासंगिक वर्णन, लौकिककथा मांडणाऱ्या, भेदिक व अध्यात्मिक, मजुरा, सामाजिक परिस्थिती, उपदेशपर, वैराग्य, स्थान महिमा, देववर्णन, गाण्यांच्या लावण्या इ. विविध विषयांवर आधारित रचनांची प्रामुख्याने निर्मिती

झाली. या रचनांनी पौराणिक काळात रमणाऱ्या शृंगाररसाला वर्तमानकाळामध्ये खेचून आणले आणि जीवनाने रसरसलेली जिवंत चित्रे त्यांनी लावणीमध्ये रेखाटली हाच कालखंड लावणी या गीतप्रकाराला पोषाक ठरला. लावणीच्या पाऊलखुणा यापूर्वी संतांच्या विराव्यागौळणी, गाथा, इ. गितामधून आढळतात. याचाच अर्थ पेशवाईच्या पूर्वकाळापासून महाराष्ट्रात लावणी हा मनोरंजनाचा वाद्याचा प्रकार होता. कृषिकर्म करण्याच्या प्रसंगी महाराष्ट्रात लौकिक गिते म्हणण्याची परंपरा होती या प्रकाराच्या स्वरूपातून लावणीचे स्वरूप पुढे बहारत गेले शिवकाळापेक्षा या काळात मनोरंजनाची कला अधिकच विस्तारली.

पेशवेकाळात होनाजी बाळा याच्या लावण्या पौराणिक, ईश्वरस्तुती, सामाजिक, शृंगारिक, क्षेत्रवर्णन या आशयाला धरून निर्माण झाल्या. त्यापैकी भूपाळी लावणीमधील घनःशाम सुंदरा ही लावणी अजरामर मानली जाते.[६] याच काळात मराठी राज्याचे साम्राज्यात रूपांतर झाले असताना मराठे सरदारांना दिर्घकाळ महाराष्ट्राच्याबाहेर मोहिमेवर जावे लागत अशा प्रसंगी विरहाच्या संदर्भातील लावणी मधील होनाजी बाळा याची रचना मांडताना वर्णन

'पति प्रवासामधि सखे मी येकली मंदिरी ।

कंठू काळ कुणाच्या बळे । पाठवा पत्र लिहुनिया तरी ।।

झुरझुरूनी पांजर झाले शरीर निपत राहिली हाडे ।

रात्रदिवस घोकणी पतीच्या लक्ष वाटेकडे ।'[७]

विरहाच्या लावण्याव्यतरिक्त मल्हारी मार्तंडवर लावणीची क्र.सहाची रचना करताना 'तो मल्हारी दृष्टि पाहिला नगाचे शिरी' वतनासंबंधी रचना मांडताना कवि शांतगुण रतन राधिके । होनाजी बाळाचे वतन राधिके इ. ।।[८] अशा सुमारे विविध विषयावर आधारित लावण्यांची रचना होनाजी बाळा यांनी केली त्याच्या अध्यात्मिक व भेदिक लावण्या या शास्त्रीय संगीताच्या शैलित सादर केल्या जात होत्या. विविध लावण्यामध्ये कृष्णगोपिंचा शृंगार रचना करणारा होनाजी बाळा हा लावणीकार शाहिर आघाडीवर होता. सामाजिक वास्तवतेची परिसीमा झुगारूनही त्याने शृंगारातील विविध अवस्थांचे चित्रण समाजासमोर लावणीच्या रूपाने मांडले उदा.पती विरह रचना, निपुत्रिक स्त्रियांच्या मनातील तळमळ व्यक्तिवर्णन रचना असे प्रसंग लावणीने समाजापुढे मांडले

याच कालखंडामध्ये अनंत फंदी याने पौराणिक, शृंगारिक, सामाजिक, दैवतवर्णन, कथाकथनावर आधारित सामाजिक विषय इ. यांचा आधार घेवून लावणीची परंपरा ही समृद्ध बनवली उदा.दैवतवर्णन मांडणारी ठाकुरजी लावणी, पौराणिक लावणी म्हणजे श्रीकृष्णाची लावणी, मराठी जीवनपद्धतीचे वर्णनात्मक स्वरूप मांडणारी 'चंद्रावळ लावणी' शृंगारिक लावणीमध्ये बोल गडया मशी नरम, हारतुरे तुला धीरा मी गुफंले इकथानक लावणीत 'राजाला कन्या झाली', सामाजीक लावणी प्रकारामधील 'शहाणा पंडीत, जमाना आला आला उराटा' या सारख्या लावणींची रचना म्हणजे मराठेकालीन सांस्कृतिक जीवनात लावणी हा प्रकार लोकप्रिय बनविला.

पेशवेकालीन शाहिर अनंत फंदी यांच्या लेखनीस समाजकारण, राजकारण, जीवनातील कटु प्रसंग यामुळेच त्यांनी औपरोधिक लावणी रचना केल्या.

'हे मुर्खा खूण तर्का पर्का पुरूषआपला नसे ।

तशा मधी कोणी विरळा प्रीत चालवितसे ।।

म्या म्हटले हा चक रूपया दिसतो माल खरा ।

वाजुन पाहतोतो आत तांब्याचा भुरभुरा ।।'[९]

याशिवाय भगवंताची चोवीस नावे एकत्र करून 'अक्रुर' ही लावणी रचना म्हणजे भक्तीभावपूर्ण लावणी मानली गेली. अशाच आशयावर आधारित शाहिर परशुरामांच्या रचना होत्या परशूराम याच्याअध्यामिक लावणीमध्ये संतपरंपरा

यांच्याशी नाते जोडून ईश्वराचे महात्म लावणीच्या माध्यमातून मांडले कोणत्याही शुभ कार्याप्रसंगी ईश्वराची म्हणजे गणपतीची आराधना करण्याचा विचार यांनीच मांडला प्रकृती व पुरूषाचे सकारात्मक वर्णन लावणीच्या अनुशंगाने मांडणारे शाहीर ठरले. पौराणिक स्वरूपाच्या, स्त्रीजीवनावरील शृंगारिक लावण्या, विरहात्मक रचना, समाजातील संघर्ष, कौटुबिंक स्थिती व संघर्ष सन्मार्गासाठी उपदेशपर लावण्या, अपत्यहिन स्त्री व्यथा इ. विषयांचा आढावा घेवून रचना मांडल्या तर स्थलविषयक लावण्यांच्या रचनामधून तत्कालीन ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक ठिकाणांचा महिमा लावणींच्या माध्यमातून वर्णिला.[१०] त्यांच्या लावणीतून वेदांतपर रचनाहीमांडलेल्या दिसून येतातया रचनांच्या माध्यमातून मानवी जीवनाचे चित्र लावणीत रेखाटणारे शाहीर परशुराम होते.

'त्रिगुणांचे तीनपण केले सर्व पाहिली मजा ।
आत्महित काय जन्मुन केले मी अपराधी तुझा ।।'[११]

लावण्यांमध्ये विविधता होती. देशभक्ती, शृंगार, व्यथा, कथा, वेदांत, प्रभावी शब्दात व्यक्तिचित्रांचे सामर्थ्य ही त्यांच्या लावणीची वैशिष्टये मानली जात. शाहीर राम जोशी पंडित कवी व शाहीर यांनाजोडणारा दुवाच मानला जात होता. शृंगारिक प्रकारच्या लावणीमुळे त्याला मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळाली संस्कृतीमधील संकेतांचे अनुकरण करून मराठमोळ्या स्त्रिचे सौदर्य, तिचा शृंगार लावणीतून मांडणारे रामजोशी होते. उदा. सुंदरा मनामध्ये भरली ही लावणी याच निकषावर आधारित मांडली. रामजोशीच्या श्रीकृष्ण गोपींतील लीलांचे शृंगारिक वर्णन, शृंगारिक लावण्या, लौकिक शृंगारिकता यामध्ये संयम होता यामधून सुरेख, बोलकी अशा स्वरूपाची शब्दचित्रे रेखाटली. त्यांच्या लावणीच्या वर्णनात आर्तता, कारूण्य, विरह, विलास, सौदर्य सामावलेले होते. त्यांच्या पौराणिक देवदेवतापर लावणीमधून पंढरपूरवर्णन, तुळजापूर वर्णन, बार्शीचा भगवंत इत्यादींची वर्णने येतात. उदा. तुळजापूरवरील लावणीत,

▪ तनुविक्षत करि कल्लोळ तीर्थिचे पाणी ।
जान्हवी गायमुख धारा, पडे अखंड ।।'[१२]

रामजोशींच्या उपदेशपर लावण्या मानवी मनाची पकड घेणा-या होत्या. नरजन्मामधी नरा करूनि घे घर नारायण गडी । तरिच हे सार्थक मानवकुडी ।। या शब्दात समाजाला हितोपदेश मौलिकतेने दिला. यातही परमेश्वर भक्ती हाच विषय उपदेशातून समाजासमोर ठेवला तरसामाजिक लावणीमधून पेशवेकालीन दुष्काळाची स्थिती रामजोशी यांनी मांडली

शाहीर प्रभाकर यांच्या शृंगारविषयक लावण्यामधून दुसरे बाजीराव पेशवे यांच्या विलासी जीवनातील प्रसंग मार्मीकपणे मांडलेले दिसून येतात. त्यांच्या लावणीमधून स्त्री सौदर्य, भावभावना, हर्ष-खेद, मिलन-विरह, मातृत्व हे समजपणे दिसून येणारे भाव होते. उदा. गर्भवासिनी लावणीमधून मातृत्व लाभल्याचा हर्ष झाल्यानंतर प्रभाकर यांनी

'सकल दिवस दुःखाचे भासती आज सखे सरले ।
आज सखे सरले, मनोरथ पुत्राचे पुरले।।'[१३]

या रचनेवरून मार्मीकपणा हे त्यांच्या लावणीचे लक्षण प्रत्यायास येते. प्रभाकरांच्या पौराणिक पद्धतीच्या लावणीमध्ये श्रीकृष्ण, रामकथा, शंकर, पार्वती संवाद यांच्या रचनावर आधारित विषय होते तर स्त्रीया व पुरूष यांच्या सौदर्याचे वर्णने शृंगारिक लावणीचे विषय प्रभाकर यांनी मांडले त्याकाळी शाहीर प्रभाकराच्या लावणीमधून सामाजिक जीवनातील समृद्धी, विलास आणि कलात्मक सौदर्य यांचे चित्र लावणीत सहजपणे दिसून येते. मराठी, उर्दू-हिंदी भाषेतही प्रभाकरांची रचना समाजव्यवहार, प्रथा, परंपरा, चालरिती, भावनांचा अविष्कार याने समृद्ध झालेली होती. याच काळात जातीने मुस्लीम धर्माचे असणारे मराठी संत व संस्कृतीशी प्रभावीपणे एकनिष्ठ असलेले शाहिर सगनभाऊ यांनी महाराष्ट्रातील मराठी लोकजीवन या संस्कृतीमधील देवदेवतांचा आदर लावणीमधून प्रकट केला. उदा. संतांची पायधूळ

होवून जन्माचे सार्थक करा असा उपदेश देतात श्रीकृष्ण, विठ्ठल, श्रीराम यांच्या भक्तीचा महिमा मार्मीकपणे वर्णनाने मांडणारे सगनभाऊ होते.

पौराणिक स्वरूपाच्या लावणीमध्ये महाभारत, रामायणमधील महत्त्वाच्या घटना व प्रसंगाची स्थिती लावणीच्या माध्यमातून त्यांनी पेशवेकाळात मांडली शृंगारिक लावणी प्रकारात मनोभावनेला प्राधान्य देणारे शाहीर होते. यातूनही व्यवहारिकपणे नायिकेच्या रूपाने सहजपणे संवाद रचना करत उदा. आली दुनिया उफराटी तर तुम्ही सावधगिरीने असा असा उपदेश मांडतात.[१४]सगनभाऊच्या लावणीमधून मराठेकालीन पेशवाईतील सामाजिक, सांस्कृतिक जीवन, महाराष्ट्रीयन माणसांची संस्कृती, नीती-अनितीच्या कल्पना यांचा अविष्कार तर लावणीद्वारे पेशवेकालीन समाज संस्कृती दर्शन सहजपणे प्रत्ययास येते.[१५]

थोडक्यात मराठेकालीन कालखंडात लावणीतील लोकजीवन व त्याचे विषय बहुजन समाजाच्या नित्य परिचयाचे व अनुभवाचे असल्यामुळे समाजासमोर सविनय व ठसक्यात म्हटली जात. लावणीची रचना करणारे कवी हे स्वतः संस्कृत जाणणारे व विद्वान होते. समाजभिमुख रचना करून लावणीला सांस्कृतिक जीवनात काव्याची प्रतिष्ठा प्राप्त याच काळात झाल्याने काव्याचा स्वतंत्र, रमणीय आणि लयबद्ध आविष्कार लावणीच्या रूपाने समाजात निर्माण झाला.

मराठेकालीन पेशवाईच्या उत्तर काळात लावणी बहराला आली पेशवाईच्या विनाश काळात लावणीचा -हास होण्यास सुरूवात झाली. कारण लावणीकारांचा सधन वर्गाचा आश्रय नाहीसा झाला. स्वतःच्या उदरनिर्वासाठी त्यांनी इतर मार्गाचा अवलंब केला असे जरी असले तरी लावणीच्या रचनेमधून मराठेकालीन समाज, संस्कृती, परंपरा, रितीरिवाज, लोकजीवन, पेशवे व त्यांचा काळ, समाजातील स्त्रीजीवन, पौराणिक, धार्मिक, सामाजिक, शृंगारिक, अध्यात्मिक, राजकीय जीवन लावणीच्या माध्यमातून समाजासमोर आले. त्याचा परिणाम मराठेकालीन लोकसंस्कृती सामाजिक जीवनात विस्तारत गेली, लोकसंस्कृतीतील विविध घटकांना महत्त्व प्राप्त होत गेले, लोकमनावर अधिराज्य मिळवले, मराठी काव्यवाङ्मयाच्या परंपरेत तीने स्वतंत्र स्थान निर्माण केले लोकरंजनातून उद्बाबोधन व समाजजीवनाचे चित्रण सांस्कृतिक जीवनात मांडले

## निष्कर्ष:

१. मराठेशाहीच्या काळात सांस्कृतिक जीवनात शाहिरी काव्याचा दुसरा प्रकार म्हणजे लावणी'ला महत्त्व दिले जात होते.
२. लावणीची रचना करणारे कवी हे स्वतः संस्कृत जाणणारे व विद्वान होते.
३. मराठेकालीन पेशवाईच्या उत्तर काळात लावणी बहराला आली.
४. लावणीच्या रचनेमधून मराठेकालीन समाज, संस्कृती, परंपरा, रितीरिवाज, लोकजीवन, पेशवे व त्यांचा काळ हा स्पष्ट केला.
५. समाजातील स्त्रीजीवन, पौराणिक, धार्मिक, सामाजिक, शृंगारिक, अध्यात्मिक, राजकीय जीवन लावणीच्या माध्यमातून समाजासमोर आले.
६. मराठी काव्यवाङ्मयाच्या परंपरेत लावणीने स्वतंत्र स्थान निर्माण केले
७. शाहीर प्रभाकराच्या लावणीमधून सामाजिक जीवनातील समृद्धी, विलास आणि कलात्मक सौदर्य यांचे चित्र लावणीत सहजपणे दिसून येते.
८. देशभक्ती, शृंगार, व्यथा, कथा, वेदांत, प्रभावी शब्दात व्यक्तिचित्रांचे सामर्थ्य ही त्यांच्या लावणीची वैशिष्ट्ये मानली जातात.

९. पेशवेकालीन शाहिर अनंत फंदी यांच्या लेखनीस समाजकारण, राजकारण, जीवनातील कटु प्रसंग यामुळेच त्यांनी औपरोधिक लावणी रचना केल्या.

## संदर्भ:


१. डॉ. पाटील बी.एन., प्राचीन महाराष्ट्र वाङमय वैभव, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, प्रथमावृत्ती २००९, पृष्ठ क्र.४३४.
२. कित्ता, पृष्ठ क्र.४३४.
३. कित्ता, पृष्ठ क्र.४३४.
४. डॉ.सरदेसाई माया, भारतीय रंगभूमीची परंपरा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती१९९६, पृष्ठ क्र.१७०.
५. पूर्वोक्त, जोग रा. श्री., मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड.३, पृष्ठ क्र.४४४.
६. केळकर य.ना. (संपा.) ऐतिहासिक पोवाडे, मराठ्यांचा काव्यमय इतिहास, भाग २, डायमंड प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती १९४४, पृष्ठ क्र.४५.
७. उपरोक्त, भारतीय रंगभूमीची परंपरा, पृष्ठ क्र.१७०.
८. उपरोक्त, ऐतिहासीक पोवडे, मराठ्यांचा काव्यमय इतिहास, पृष्ठ क्र.४७.
९. उपरोक्त, प्राचीन महाराष्ट्र वाङ्मय वैभव, पृष्ठ क्र.४३७.
१०. उपरोक्त,, जोशी. श. ना., परशराम कवीच्या लावण्या, पृष्ठ क्र.२७.
११. उपरोक्त,, प्राचीन महाराष्ट्र वाङमय वैभव, पृष्ठ क्र.४४०.
१२. कित्ता, पृष्ठ क्र.४४२.
१३. कित्ता, पृष्ठ क्र.४४४.
१४. कित्ता, पृष्ठ क्र.४४६.
१५. मोरजे गंगाधर, वाडकर (संपा.)सगनभाऊकृत लावण्या व पोवाडे, पृष्ठ क्र. ७५.